MHAM060018002023

**आदेश नि.क्रं.०५ वर**

(दिनांक १५/११/२०२४)

अर्जदाराने मुळ अर्जासोबत कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे गैरअर्जदार कडुन अंतरीम पोटगी मिळण्याकरीताचा अर्ज / प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. मुळ अर्जास गैरअर्जदार याने नि.क्र.०८ कडे म्हणणे दाखल केले आहे व अर्जास विरोध केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच उभय पक्षकार तर्फे दोन्ही सन्मानिय विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.क्रं** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला असे सकृतदर्शनी अर्जदार हिने शाबित केले आहे काय ? | होय |
| २ | अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही असे अर्जदार हिने शाबित केले आहे काय ? | होय |
| ३. | गैरअर्जदार क्र.१ यास उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे असे अर्जदार हिने शाबित केले आहे काय ? | होय |

| | | |
|---|---|---|
| ४. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे ती गैरअर्जदार क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास दरमहा किती? | अंशतः होकारार्थी. रक्कम अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

३. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या दरम्यानचे नातेसंबंध उभय पक्षकार यांना मान्य आहेत. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिचा पती असुन गैरअर्जदार क्र.२ ते ८ हे अर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत.

**मुद्दा क्रं.१ बाबत**:–

४. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केलेबाबतच्या अनेक घटनांचा उल्लेख अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये केला आहे. त्यापैकी अर्जदाराचे कथनानुसार काही महत्वाचे आरोप असे आहेत की, दिनांक ०७.०२.२०२२ रोजी अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चे लग्न झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांचे घरी आर्वी येथे नांदण्याकरीता गेली त्याच दिवशी गैरअर्जदारांनी तिला धमकावून विचारले की, ''तुझ्या बापाने इतक्या कमी वस्तू का दिल्या, लग्नामध्ये सोन्याचे कानातले का नाही, तुझ्या वडीलांनी केले?'' त्यावेळी अर्जदार हिने गैरअर्जदारांची समजूत घालून तिच्या आईवडीलांना सर्व हकीकत सांगीतली. अर्जदार ही पत्नी व सून म्हणून कर्तव्ये पार पडत होती परंतु गैरअर्जदार क्र.१ हा क्षुल्लक कारणावरुन तिच्यासोबत वादविवाद करत होता व

तिला मारहाण करत होता. तिने तिचे नविन लग्न टिकवण्याच्या हेतूने तिच्यासोबत होत असलेल्या गाष्टीची तक्रार कोणाकडेही केली नाही. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने तिला ''तु काही दिवस माहेरी जावून ये, मग मी तुला घ्यायला येणार'' असे म्हणून गोडे बोलून तिला माहेरी पाठेवून दिले. परंतु त्यानंतर अर्जदार हिने गैरअर्जदारांना बरेच फोन केले परंतु गैरअर्जदारांनी तिचा व तिच्या वडीलांचा फोन नंबर ब्लॉक करुन ठेवला होता. त्यामुळे तिचे वडील स्वत: तिला घेवून आर्वी येथे गेले असता गैरअर्जदारांनी तिच्यासोबत व तिच्या वडीलांसोबत भांडण करुन त्यांना घराबाहेर हाकलून दिले. तेव्हपासून म्हणजेच दिनांक ०९.०७.२०२२ ती तिच्या आईवडीलांच्या घरी त्यांच्या आश्रयाने राहात आहे. गैरअर्जदारांनी तिचे सोन्याचे दागीने विकून टाकले आहे.

५. अर्जदाराने वर नमुद केलेले कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप गैरअर्जदार यांनी नाकारले आहेत. गैरअर्जदार यांचे कथनानुसार अर्जदार हिचे सर्व आरोप खोटे आहेत. त्यांचे दरम्यानचे नातेसंबंध त्यांनी मान्य केलेले आहेत. परंतु त्यांचे कथनानुसार त्यांच्या लग्नाचा दोन्हीकडील खर्च त्यांनीच केला होता. अर्जदार ही लग्नानंतर त्यांच्या घरी राहाण्यास आली तेव्हापासून त्यांनी तिला अत्यंत प्रेमाची, आदराची आणी सलोख्याची वागणूक दिली. परंतु अर्जदार सुरुवातीपासून हट्टी व उध्दट स्वभावाची असल्यामुळे सर्वांसोबत उध्दटपणे वागली तसेच गैरअर्जदार क्र.१ ला अपमानास्पद वागणून देत होती व म्हणत होती की, ''हे लग्न माझ्या मर्जी विरुध्द झाले, मला चांगला, देखना व सुंदर नवरा अपेक्षीत होता, तुम्ही एकदम काळे आहात, तुम्ही मला नवरा म्हणून शोभत नाही'' असे बोलून त्याचा अपमान करीत होती. तसेच लग्नाच्या तिस–या दिवशी सत्यनारायणाची कथा अर्जदाराचे माहेरी ठेवण्यात आली तेव्हा अर्जदाराचे आईवडीलांनी मेकअपचे सामान बरोबर आणले नाही यावरुन त्यास

शिवीगाळ केली आणी त्याला मारायला धावले आणी त्याचवेळी अर्जदार हिने त्याच्यासोबत येण्यास नकार दिला. त्यावेळी अर्जदाराचे आईवडीलांनी त्याला ''कोर्टात जा तेथून मुलीला पाठवू'' असे म्हटले. तसेच अर्जदाराचे आईवडीलांनी धमकी दिली की, जो पर्यंत गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारासाठी दोन तोळे सोन्याचा हार करुन तिच्या गळयात टाकत नाही तो पर्यंत ते मुलीला पाठवणार नाही. परंतु तो २००/– रुपयाने मजुरीचे काम करीत असल्यामुळे त्याने त्याबाबत नकार दिला म्हणून चिडून जावून अर्जदार हिने पो.स्टे. आर्वी येथे गैरअर्जदार क्र.१ विरुध्द खोटा रिपोर्ट दिला. त्यानंतर अर्जदार हिने महीला सेलकडे तक्रार केली असता त्याने नांदवण्यास तयार असल्याचे म्हटले असता अर्जदार हिने नांदण्यास नकार दिला. तो चांदरबाजार येथे समुपदेशनाकरीता गेला असता तेथे अर्जदार व तिचे आईवडीलांनी त्याला मारहाण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. तो अर्जदार हिला नांदवण्यास तयार असुन ती स्वमर्जीने तिच्या आईवडीलांकडे राहात आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

६. या अनुषंगाने एक बाब नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुतचा अंतरिम पोटगी बाबतचा अर्ज निकाली करतांना सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही. अर्जदार हिने अर्जातील सर्व आरोप सत्य प्रतिज्ञेवर कथन केले आहे. अर्जदार ही स्त्री आहे व कोणतीही स्त्री विनाकारण तिच्या संसाराचा त्याग करुन माहेरी राहणार नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये संरक्षण अधिकारी यांनी कौटूंबिक घटना अहवाल दाखल केलेला आहे. यावरुन गैरअर्जदार क्र.१ ते ८ यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे असे सकृतदर्शनी शाबित होत आहे. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी दिला आहे.

<u>मुद्दा क्रं.२ ते ४ बाबत:-</u>

७. अर्जदार हिच्या कथनानुसार तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिने तिचे मालमत्ता व देयकेचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६ कडे दाखल केले आहे. याउलट गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे मालमत्ता व देयके प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन आहे असे गैरअर्जदार याचे कथन नाही. त्यामुळे अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही असे सकृतदर्शनी शाबीत होत आहे.

८. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ याचेकडे स्वत:चे घर असुन ते आठ खोल्यांचे आहे तसेच त्याचा मटणाचा मोठा व्यवसाय असुन तो प्रति दिवस रु.४,०००/- ते ५,०००/- हजार रुपये उत्पन्न मिळवतो. सदरची बाब गैरअर्जदार क्र.१ याने नाकारलेली आहे. केवळ त्याचे म्हणणेचे परीच्छेद क्र.०३ मध्ये तो साधारण मजुर असुन जेमतेम रु.२००/- मजुरीने काम करतो त्यामुळे अर्जदारसाठी दोन तोळे सोन्याचा हार घेणेस त्याने नकार दिला असे कथन केले आहे. परंतु त्याने त्यास उत्पन्नाचे नेमके काय साधन आहे याबाबत उल्लेख केलेला नाही. तसेच त्याने त्याचे मालमत्ता व देयके प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे या क्षणी अर्जदार कथन करते त्यानुसार गैरअर्जदार क्र.१ यास उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे असे सकृतदर्शनी शाबीत होत आहे.

९. पोटगीची रक्कम ठरवतांना उभय पक्षकार यांचे राहणीमान, त्यांचे उत्पन्न, गैरअर्जदाराचे उत्पन्न, गैरअर्जदार याचेवर अवलंबून कोण कोण अवलंबून आहे, वैद्यकीय खर्च, जिवनावश्यक वस्तूंच्या किंमती, कपडेलत्ते, घरखर्च, घरभाडे इत्यादी बाबींचा विचार

करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान सर्वसाधारण असल्याचे दिसून येते. अर्जदार ही तिचे वडीलांचे घरी राहात आहे. या सर्व बाबी तसेच जिवनावश्यक वस्तुंच्या किंमती, औषोधोपचाराचा खर्च, घरखर्च, कपडेलत्ते व घरभाडे रक्कम याचा खर्च या बाबींचा विचार करता अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला दरमहा र.रु.३,०००/– अंतरीम पोटगीची रक्कम मंजुर करणे योग्य व उचित आहे. सबब, अर्ज अंशतः मंजुर होणेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्रं.२ ते ४ चा निष्कर्ष होकारार्थी दिला असुन मुद्दा क्र.५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्ज दाखल तारखेपासुन ते प्रस्तुत प्रकरणाचा निकाल होईपर्यंत अर्जदार हिला दरमहा र.रु.३,०००/– पोटगीची रक्कम द्यावी.

३. या आदेशाची प्रत उभय पक्षकार यांना विनामुल्य देण्यात यावी.

*आदेश खुल्या न्यायालयात घोषित.*

RAJENDRA DINKAR CHOUGALE

Digitally signed by RAJENDRA DINKAR CHOUGALE
Date: 2024.11.16 11:00:32 +0530

दि. १५.११.२०२४.

**(राजेंद्र दि. चौगले)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.१, अचलपुर.